# कंत्राटी कामगारांच्या मागण्या

कंत्राटी पध्दत कामगारांचे शोषण करणारी असल्याने ती बंद करावी अशीच म.वि.कामगार महासंघाची मागणी आहे, परंतु जोपर्यंत ही पध्दत बंद होत नाही तोपर्यंत कंत्राटी कामगारांसाठी आम्ही खालील मागण्या करीत आहोत :

(१) सध्या जे कंत्राटी कामगार आहेत ते अनेक वर्षांपासून कंत्राटी पध्दतीने कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवाचा कंपनीला फायदा व्हावा या हेतुने सध्या कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना विद्युत कंपन्यांमध्ये कायम केले जावे.

(२) कंत्राटी कामगारांना जे वेतन मिळते ते अत्यल्प आहे, त्यात भरीव वाढ व्हावी.

(३) २०१० नंतर विशेष पुरक भत्त्यात दर सहा महिन्यांनी २५०-३५० रुपयेपर्यंत वाढ झालेली आहे.महागाई भत्त्यात वाढ होत असतांना मात्र किमान वेतन दरात वाढ झालेली नाही. ती होणे अतिशय आवश्यक आहे. रोजंदार कामगारांसाठी जसा टक्केवारीचा ( Graded Monetary Benefit) फॉर्म्युला आहे. त्याच धर्तीवर कंत्राटी कामगारांचा वेतन फॉर्म्युला असावा.

(४) पायलट प्रोजेक्ट योजना राबवितांना अभियंते व कर्मचारी यांच्या अडचणींकडे लक्ष दिले गेले परंतु कंत्राटी कामगारांच्या मुलभूत आवश्यकतांकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. अनेक कंत्राटी कामगार नियमित कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांवर काम करीत असल्याने ते कंपन्यांमधील अपरिहार्य कामगारच आहेत व या माध्यमातून मिळणाऱ्या रोजंदारीवरच त्यांचा प्रपंच अवलंबुन असतो. तेंव्हा त्यांचा रोजगार जाणार नाही एवढे तरी व्यवस्थापनाने पाहिलेच पाहिजे.

(५) कंत्राटी कामगारांना मिळणारे वेतन मुळात अत्यल्प आहे. परंतु हे अत्यल्प वेतनसुध्दा अनेक कामगारांना वेळेवर मिळत नाही. ह्याबाबत व्यवस्थापनाने अनेकदा सुचना दिलेल्या आहेत, परंतु त्या सुचनांचे सुध्दा पालन होत नाही. कंत्राटी कामगारांना कायद्याने जे लाभ मिळतात ते त्यांना मिळालेच पाहिजे ते न देणाऱ्यांवर कंपनीने कडक कारवाई केली पाहिजे.

(६) बरीच नियमित कामे कंत्राटी कामगार करीत आहेत, उदा. सब स्टेशन ऑपरेटर, कॉम्प्युटर ऑपरेटर, बील डिस्ट्रीब्युटर, थकबाकी वसुली, केबल व वीज वाहक तारा दुरुस्ती, मिटर रिडींग, लाईन हेल्पर अशा कामगारांना 'समान काम समान दाम' हे तत्व लागू करावे.

(७) कंत्राटी कामगार जन संपर्कात येत असल्याने त्यांना कंपनीने ओळखपत्रे द्यावीत.